प्रेस नोट दि.२२/१२/२०१६

दि.२०/१२/२०१६ रोजी कोथरुड पोलीस स्टेशनच्या हद्दीत महात्मा सोसायटी जवळ,कुमार परिसर याठिकाणी (१) अमर बाजीराव कराडकर,वय-२३ वर्षे,रा.फ्लॅट नं.८, उत्तम हाईट्स अचानक चौकाजवळ, उत्तमनगर, पुणे (२) भगवान बाबु मरगळे वय-२०वर्षे, रा.स.नं.१११,शिवकल्याणनगर,सुतारदरा,कोथरुड,पुणे हे दोन इसम संशयितरित्या मोटार सायकलवर मिळून आले होते, त्यावेळी त्यांच्याकडे असणारी मोटारसायकल व त्यांच्याकडे सखोल चौकशी केली असता त्यांनी त्यांचे आणखी दोन साथीदार (१) कुलदीप हरीओम वाल्मिकी वय-२३वर्षे,रा.फ्लॅट नं.२०२,ट्रेनीटी रेसीडेन्सी,उत्तमनगर,पुणे, (२) निलेश अशोक देशमाने वय-२३वर्षे,रा.स.नं.१११,सुतारदरा,कोथरुड,पुणे यांच्यासह कोथरुड पोलीस ठाणेच्या हद्दीतील ३ गुन्हे, हिंजवडी पोलीस ठाणेच्या हद्दीतील ३ गुन्हे, चतुःश्रृंगी पोलीस ठाणेच्या हद्दीमध्ये १ गुन्हा असे चेनचोरी व हत्यारांचा धाक दाखवून जबरी चोऱ्या केल्याचे गुन्हे उघडकीस आले आहे. सदरचे आरोपी हे निर्जन ठिकाणी एकटया चाललेल्या महिलांच्या गळयातील मंगळसुत्र पळविणे तसेच हायवे लगत असणाऱ्या सर्व्हिस रोडवर कोयत्याचा धाक दाखवून जबरी चोऱ्या करीत असल्याचे गुन्हे उघडकीस आले आहेत. सदर आरोपींकडून १२० ग्रॅम सोन्याचे दागिने, तीन मोटार सायकल, १० मोबाईल हॅडसेट, दोन कोयते, दोन चाकु,व रोख ४०००/-रु.असा एकुण ५,२४,०००/- (पाच लाख चोवीस हजार) रुपये किं. चा माल हस्तगत करण्यात आला आहे. सदर आरोपींकडे चौकशी केली असता आरोपी हे कोल्हापुर येथे तालमीत जावुन पहिलवान बनण्यासाठी चोऱ्या करीत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. तसेच या व्यतिरिक्त आणखीन गुन्हे त्यांचेकडून उघडकीस येण्याची दाट शक्यता आहे. तसेच सदर आरोपींमुळे कोथरुड,वारजे,हिंजवडी या परिसरामध्ये नागरिकांमध्ये घबराट निर्माण झालेली होती. सदरची टोळी पकडून पोलीसांनी त्यांना अटक केलेली आहे.

वरील गुन्हयांची उकल ही श्री.शशिकांत शिंदे,मा.अपर पोलीस आयुक्त दक्षिण प्रादेशिक विभाग, मा. श्री. सुधीर हिरेमठ,पोलीस उपआयुक्त परिमंडळ -१, पुणेशहर मा.श्री.तुकाराम गौड,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त,डेक्कन विभाग,पुणेशहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन भोसले पाटील व पोलीस निरीक्षक (गुन्हे) एस.एस. खटके पोलीस उपनिरीक्षक प्रेम वाघमोरे, पोलीस कर्मचारी विलास जोरी, भालचंद्र निंबाळकर, सचिन कुदळे, अश्वजीत सोनावणे, ज्योतीबा पवार, विनायक पाडळे यांचे पथकाने कारवाई केली आहे.

